# जाहिरात

## जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर

### वॉक इन इंटरव्ह्यूद्वारे तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत थेट मुलाखत.

मा.जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निवड समितीद्वारे आरोग्य सेवा, नागपूर मंडळाअंतर्गत असलेल्या चंद्रपूर या जिल्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, येथील महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा (गट-अ) यांची रिक्त पदे तदर्थ वैद्यकीय अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्याचे कालावधीसाठी तात्पूरत्या स्वरुपात **खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन भरावयाची** आहेत.

१)सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यासाठी किंवा सदर पदावर एम.बी.बी.एस. अर्हता धारक नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच राहील.

२) सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यासारखे म.ना.से.निवृत्तीवेतन ,म.ना.से.(रजा),नियम लागू राहणार नाहीत तसेच ते विमा योजना ,भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाहीत.

३)सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

४)कंत्राटी तात्पूरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहीत मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पूरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.

५)केवळ तात्पूरती कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

६)सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

७)सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना सेवाकाळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक माहिण्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

८)वरिल सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१००/- चे स्टॅम्पपेपर करारनामा करण्यात येईल.

सदरहू **तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पदे भरण्यासाठी माहे २४ डिसेंबर २०१८ पासून दर सोमवारी वॉक-इन-इंटरव्ह्यू सकाळी ११.०० ते दु.२.०० वाजेपर्यंत (शासकीय सूटीचे दिवस वगळून) जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर येथे आयोजित करण्यात येत आहे.** तरी इच्छूक एमबीबीएस/विशेषज्ञ अर्हताधारक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरीता नमूद दिनांक व वेळेत उपस्थित रहावे.

उमेदवारांनी येतांना सोबत एम.बी.बी.एस. व विशेषज्ञ पदासाठी पदव्यूत्तर पदवी/पदविका यांचे सर्व वर्षाचे गुणपत्रिका, पदविका/पदवी प्रमाणपत्र, वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकीत प्रतीचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादी सोबत घेवून येणे आवश्यक आहे.

उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच अनधिकृत गैरहजर असलेल्या/संपामध्ये सहभागी असलेले/शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढून टाकलेले वैद्यकीय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही.

अ) एमबीबीएस पदाकरीता आदिवासी दूर्गम भागात ४५,०००/- व इतर भागात रु.४०,०००/- एवढे मानधन राहील. **(एकूण रिक्त पदे - ५० )**

ब) विशेषज्ञ पदाकरीता आदिवासी दूर्गम भागात ५५,०००/- व इतर भागात रु. ५०,०००/- एवढे मानधन राहील. **(एकूण रिक्त पदे - १० )**

स्वाक्षरी
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती
तथा,जिल्हाधिकारी,चंद्रपूर

स्वाक्षरी
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हा शल्यचिकित्सक,चंद्रपूर